# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

## Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:— ''उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची सन २०२४—२५ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...''**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचे संदर्भ पत्र क्र. महाडीबीटी—२०२४—२५/(५११५८७/२०२४)/शिष्यवृत्ती शाखा/६५८९, दि. ०७/०८/२०२४ अन्वये राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे कळविले आहे. शैक्षणिक वर्ष सन २०२४—२५ करीता महाडीबीटी पोर्टलवरून शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांना दि. २५/०७/२०२४ पासून ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सबब, मा. विभागप्रमुख/संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल व मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था यांना या परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व पात्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा व कोणताही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव,

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/२४९३ }
दिनांक :१२/०८/२०२४ }

**सोबत :**

मा. शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचे दि.०७/०८/२०२४ रोजीचे पत्र

**प्रत:**

१. मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/(५११५८७/२०२४)/शिष्यवृत्ती शाखा/ 6४Ce दिनांक : ०७.०८.२०२४

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची सन २०२४-२५ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२४-२५/डीबीटी/५११५८७ दि. ०५.०८.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांना दि. २५.०७.२०२४ पासून ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता सुविधा देण्यात आली आहे. याबाबत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी. याची सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी नोंद घ्यावी.

महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

| अनु.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| १ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| २ | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| ३ | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ४ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| ५ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| ६ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ७ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |

| | |
|---|---|
| ८ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| ९ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| १० | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ११ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| १२ | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-२) |
| १३ | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| १४ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

सन २०२४-२५ करीता महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे तसेच महाविद्यालयातील लिपीक व प्राचार्य यांना अर्जाची पडताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी महाडीबीटी पोर्टलवर मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

**विद्यार्थ्यांसाठी सूचना : -**

१. उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी http://mahadbt.maharashtra.gov.in या लिंकवर महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

२. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन / पूर्ण माहिती घेऊन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

३. उपरोक्त शिष्यवृत्तीबाबत अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.

४. विद्यार्थी डी.बी.टी. पोर्टलद्वारे लागू असलेल्या एकापेक्षा अधिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरु शकतात तथापि संबंधित विद्यार्थ्यांस त्यांनी निवडलेल्या Preference नुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असल्याने शिष्यवृत्तीचा Preference काळजी पूर्वक नोंदविण्यात यावा.

५. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज विभागस्तरावरुन मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जांकरीता Right To Give Up हा पर्याय निवडताना याबाबत काळजीपूर्वक निवडावा. Right To Give Up हा पर्याय चुकून अथवा अन्य कारणस्तव निवडला गेल्यास मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना मिळणार नाही. याची सर्व विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

६. विद्यार्थ्यांना अर्जासोबत शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने पात्रतेकरीता आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे.

७. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये गुण नोंदविताना ते टक्केवारी (%) मध्ये नोंदविणे अनिवार्य आहे. संच निर्धारित असलेल्या शिष्यवृत्तीसाठी लाभार्थ्यांची निवड शिष्यवृत्तींच्या अटीनुसारच (उदा. टक्केवारी, उत्पन्न इ.) करण्यात येते.

शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे अनिवार्य आहे.

९. विद्यार्थ्यांनी त्यांचा आधार क्रमांक हा भ्रमणध्वनी / मोबाईल क्रमांकासोबत संलग्नित करणे अनिवार्य आहे. भ्रमणध्वनी / मोबाईल क्रमांक बदलल्यास किंवा भ्रमणध्वनी / मोबाईल हरवल्यास डी.बी.टी. पोर्टलवर लॉगिन करण्यास कोणतीही समस्या निर्माण झाल्यास नवीन भ्रमणध्वनी / मोबाईल क्रमांक हा आधार क्रमांकासोबत संलग्नित केल्याशिवाय त्या विद्यार्थ्यांना फॉरगॉट पासवर्ड पर्याय निवडल्यानंतर सुध्दा आधार संलग्नित भ्रमणध्वनी / मोबाईल नसल्याने ओ.टी.पी. येत नाही. त्यामुळे डी.बी.टी. पोर्टलवर लॉगिन करता येत नाही. कृपया याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेच्या मदतीने पूर्ण भरुन घ्यावा.

११. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.

१२. विद्यार्थ्यांना डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणी केल्यानंतरच ऑनलाईन अर्ज भरता येतात. नोंदणी केल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांचा युजर नेम आणि पासवर्ड हा जतन / सेव्ह करुन ठेवावा. पुढील वर्षाकरीता ऑनलाईन अर्ज करताना त्याच युजर नेम आणि पासवर्ड द्वारे लॉगीन केल्यास नवीन वर्षात ऑनलाईन अर्ज करण्यास समस्या निर्माण होत नाहीत.

**महाविद्यालयांसाठी सूचना : -**

१. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने भरलेला शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या लिपीक लॉगीन मध्ये पडताळणीसाठी उपलब्ध होतात.

२. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी शर्ती लाभ, आवश्यक कागदपत्रे आदि बाबींचा काळजीपूर्वक अभ्यास करुन महाविद्यालयातील लिपीकांनी विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करावी.

३. शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली माहिती अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार अनुदानित / विनाअनुदानित, अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details), उपस्थिती, टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. महाविद्यालयाच्या लिपीकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve / Reject /Sent Back) करणे आवश्यक आहे.

nt Back केलेल्या अर्जासोबत कोणत्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे याबाबत तातडीने / मुदतपूर्व विद्यार्थ्यांना कळवावे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे मुदतीमध्ये करणे शक्य होईल तसेच त्यांचे ऑनलाईन अर्ज मुदतीमध्ये मंजूर करता येतील.

५. महाविद्यालयाच्या लिपीकांनी मंजूर (Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर उपलब्ध होतात.

६. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपीकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve / Reject /Sent Back) करणे आवश्यक आहे.

७. महाविद्यालयाच्या लॉगीनवर मागील शैक्षणिक वर्षाचे ऑनलाईन अर्ज, दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असतात. याबाबत या कार्यालयाकडून वारंवार परिपत्रकाद्वारे, अन्य सोशल माध्यमांद्वारे (वॉट्सॅप गृप, फोन करुन) सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते. तरीही काही महाविद्यालय ऑनलाईन अर्ज प्रलंबित ठेवतात. असे न करण्याबाबत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठ यांना या परिपत्रकाद्वारे पुनश्च कळविण्यात येत आहे.

८. तसेच विद्यार्थ्यांच्या अर्जांची प्रत आवश्यक कागदपत्रांसहीत जतन करुन ठेवण्यात यावी.

९. या कार्यालयामार्फत संकेतस्थळ **jdhepune.info** या कार्यालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करुन माहिती मागविण्यात येते अथवा कार्यवाही पूर्ण करण्याबाबत कळविण्यात येते. तरी सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ याची नोंद घ्यावी.

शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी शिष्यवृत्ती योजनांबाबतची सर्वसाधारणा माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालय यांनी त्यांचे नोटीस बोर्डवर दर्शनी भागात प्रसिध्द करण्यात यावे. तसेच सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त नमूद सर्व सूचनांबाबत कळविण्यात यावे. महाडीबीटी पोर्टलवर तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अर्ज करणेसाठी आवश्यक ती मदत करण्यात याव्यात. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार कार्यालयामार्फत महाविद्यालयात शिबिर / कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात. तसचे सर्व कार्यशाळांबाबतचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. केशव तुपे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.